VOL- X ISSUE- XI NOVEMBER 2023 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.367 ISSN 2349-638x

# ॲरिस्टॉटल व राज्यव्यवस्था

**डॉ. चंद्रशेखर शंकरराव ढोले**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

प्रस्तुत शोधनिबंध ॲरिस्टॉटल व राज्यव्यवस्था या शोध निबंधात ॲरिस्टॉटलने लोकशाही राज्यव्यवस्थेचा व राज्याचा आकार लोकशाही साम्राज्यावर व गुलामगिरी यासंबंधी च्या विचाराने व तत्वाने मांडणी केली आहे. प्रस्तुत शोध निबंधात संशोधकांनी ॲरिस्टॉटलना राज्यव्यवस्थेची मांडणी अतिशय वस्तुनिष्ठ मांडणी करून शासनव्यवस्था कशा प्रकारची असावी यावर त्यांनी प्रकाश टाकले आहे. शासन व्यवस्था सर्वसामान्यांच्या गरजा व कल्याणासाठी कार्य करणारी असावी. लोकांना चांगले जीवन जगता यावे. समाजात शांतता राहावी पण त्यांना गुलामांसंदर्भात जे विचार मांडले ते विसंगत होते.

राज्य ही सर्वश्रेष्ठ संस्था आहे असे ॲरिस्टॉटल मानतो. सर्वश्रेष्ठ हित हे राज्याचे उद्दिष्ट असते. राज्याची उत्पत्ती सांगताना ॲरिस्टॉटल म्हणतो की प्रथम कुटुंब निर्माण झाले. कुटुंबव्यवस्थेचा मुख्य आधार म्हणजे दोन नाती एक पुरुष व स्त्री दुसरे. स्वामी व गुलाम. ही दोन्ही नाती नैसर्गिकच आहेत. अनेक कुटुंबे एकत्र येऊन खेडे बनते. अनेक खेडी एकत्र येऊन राज्य बनते. मात्र एकत्र येणाऱ्या खेड्यांचा विस्तार स्वयंपूर्ण होण्याइतका असला तरच राज्य बनते. काळाच्या दृष्टीने कुटुंब अगोदर व राज्य नंतर असे असले तरी निसर्गदृष्ट्या राज्य हे कुटुंबाच्याच काय पण व्यक्तीच्याही अगोदरचे मानावे लागते असे ॲरिस्टॉटल म्हणतो. जेव्हा एखादी वस्तु परिपूर्ण अवस्थेला पोचते ती त्याची नैसर्गिक अवस्था असे मानले जाते. आणि मानवी समाजाची परिपूर्णत राज्यात होते म्हणून राज्य ही मानवाची नैसर्गिक अवस्था व ती व्यक्ती व कुटुंबाच्या अगोदरची असते. ॲरिस्टॉटल येथे शरीरशास्त्राचा दाखला देतो (त्याचे वडील वैद्य होते). हात किंवा पाय हे शरीराचे अवयव आहेत. हात हा हात कधी असतो? जोपर्यंत तो जिवंत शरीराशी अविभाज्य असतो. शरीर नष्ट झाले की हात हा हात राहत नाही, पाय पाय राहत नाही. कारण हात म्हणजे तरी काय विशिष्ट क्रीया या कल्पनेशी निगडित आहे. या क्रिया करणे हाताला अशक्य झाले कि हात हात राहत नाही. शरीर प्रथम व हात नंतर. व्यक्ती राज्याचा घटक असल्याशिवाय आपले कर्तव्य पार पाडू शकत नाही. म्हणून राज्य प्रथम व व्यक्ती नंतर. कायद्याशिवाय माणूस म्हणजे सर्व जनावरांत हीन असतो. कायदा अस्तित्वात राहावयाचा तर राज्य आवश्यक आहे. त्यामुळे राज्यसंस्थेने मानवजातीवर फार मोठे उपकार केले आहेत.

राज्याचा हेतू उत्तम जीवन हा आहे. केवळ समाजात देवाणघेवाण सुकर व्हावी व गुन्हे टाळावेत हा राज्याचा उद्देश नाही. उदात्त कार्यासाठी राज्य अस्तित्यात येते केवळ समुहजीवनासाठी नाही. सुखी व सन्माननीय स्वयंपूर्ण जीवन हा राज्याचा हेतू आहे केवळ सहजीवन नव्हे. न्याय म्हणजे काही अंशी समानता. राज्याने शक्य तेवढा न्याय अमलात आणण्याचा प्रयत्न करावा, असे ॲरिस्टॉटल म्हणत्तो.

**१) ॲरिस्टॉटलने मांडलेली वस्तुनिष्ठता**

राज्यात कोणाला किती महत्त्व यावरही तो चर्चा करतो, राज्य ही व्यापारी संस्था नाही किंवा पैसा मिळविण्यासाठी व्यक्तींनी केलेला करार नाही, त्यामुळे धनाला, धनिकांना काही निरपवाद नैतिक मूल्य राज्यात असू शकत नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला समान मानणेही अवघड आहे. श्रीमंतांच्या धनाची लूटमार करणारी लोकशाहीही नको आणि गरीबांची पिळवणूक करणारी महाजन सत्ताही नको. संपत्तीचे मर्यादित महत्त्व ओळखले पाहिजे. संपत्ती ही गुणजननी आहे. राजकारणात चांगल्या घरात जन्म, चांगले शिक्षण, चांगली संगत व संबंध आणि फुरसद याचा प्रभाव नाकबूल करून चालणार नाही आणि या सर्व गोष्टींचा संपत्तीशी निगडित संबंध आहे. या गोष्टीचा विचार वस्तुनिष्ठ भूमिका घेताना केला पाहिजे असे ॲरिस्टॉटल म्हणतो.

**२) लोकशाहीसंबंधी ॲरिस्टॉटलची भूमिका**

लोकशाहीचा दावाही तो मान्य करतो. राजकीय निर्णयांचा परिणाम बहुसंख्याकांना भोगावा लागतो तेव्हा बहुसंख्याकांना विचारात घेतले पाहिजे. लोक मतात शहाणपण सामुहिक अनुभवी ज्ञान व्यक्त होत असते. तेही महत्वाचे आहे. शिवाय संख्येला महत्त्व असतेच. या आधारे ॲरिस्टॉटल म्हणतो की कोणत्याच वर्गाचे समाजावर प्रभुत्व नको. कायद्याचे वर्चस्व समाजात राहिले म्हणजे ठीक होईल. राज्य हा 'जास्तीत जास्त चांगल्या जीवनाकडे जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या समान व्यक्तींचा समुदाय आहे' अशी राज्याची व्याख्या ॲरिस्टॉटल करतो. समान याचा अर्थ गुणांच्या बाबतीत समान. जर विषमता जास्त असेल तर सर्व व्यक्तींमध्ये समान गुणांचा अभाव निर्माण होतो आणि राज्य घटनात्मक व राजकीय घटक म्हणून राहू शकत नाही.

**३) ॲरिस्टॉटलने सांगितलेला काटराज्याचा आकारमान**

नगरराज्याचा आकार केवढा असावा यासंबंधी ॲरिस्टॉटल काही निकष सांगतो. राज्ये फार मोठी असली तर कारभार नीट होत नाही. राज्याचा विस्तार बेताचा असावा. ते गरजांच्या बाबतीत स्वयंपूर्ण असावे व नियंत्रणास सहजसोपे असावे. नागरिकांना परस्परांचा परिचय असावा. एकमेकांचे स्वभाव व चारित्र्य माहीत नसेल तर निवडणुकीत या न्यायदानात घोटाळे व चुका होतील. एखाद्या डोंगरमाथ्यावर सर्व भूभाग साध्या डोळ्याने दिसावा इतका राज्याचा विस्तार असावा.

**४) साम्राज्यसंबंधी ॲरिस्टॉटलचे विचार**

साम्राज्य असावे की नसावे याचा ॲरिस्टॉटल युद्धाच्या संदर्भात विचार करतो. परकीय प्रदेश जिंकणे हा राज्याचा हेतू नव्हे असे ॲरिस्टॉटल म्हणतो. तो युद्धच नको असे म्हणत नाही. ग्रीकांमधे युद्ध नको. जे 'नैसर्गिक रीत्या' स्वतःचे राज्य करू शकत नाहीत अशा 'जंगली' ग्रीकेतराशी युद्ध करणे योग्य. ग्रीक नैसर्गिक रीत्याच स्वराज्य करू शकणारे आहेत. पण युद्ध हे साधन आहे उद्दिष्ट नव्हे असा ॲरिस्टॉटलचा आग्रह आहे. युद्धात जे साध्य होईल ते शांततेने राहण्यानेही साध्य होऊ शकते. त्यामुळे युद्ध-अनिवार्य नाही.

गुलामगिरीचे समर्थन

उदरनिर्वाहासाठी श्रम करणाऱ्या लोकांना नागरिकत्व देऊ नये असे ॲरिस्टॉटलचे म्हणणे आहे. कष्टकरी व व्यापारी जीवन तुच्छ व गुणहीन असते. ती कामे नागरिकांनी करू नयेत. त्यांनी शेतीही करू नये. कारण नागरिकांना पूर्ण मोकळा वेळ असला पाहिजे. नागरिकांना शेती असावी पण त्यावर गुलामांनी राबावे. गुलाम दक्षीणेकडील ग्रीकेतर वंशाचे असावेत; कारण ते बुद्धिमान असतात पण तेजदार नसतात उत्तरेकडील वंशाचे ग्रीकेतर तेजदार असतात. तेजदार गुलाम ठेवणे जरा अडचणीचे असते, फक्त ग्रीक लोकच तेजस्वी व बुद्धिमान असतात. ते एकत्र आले तर जगावर राज्य करू शकतील असे ॲरिस्टॉटल म्हणतो.

**निष्कर्ष**

प्रस्तुत शोधनिबंध ॲरिस्टॉटल व शासनव्यवस्था या शोधनिबंधात ॲरिस्टॉटलने शासन व्यवस्थेसंबंधी जे विचार किंवा तत्त्वज्ञान मांडले आहे. त्याप्रमाणे संशोधकांनी काही निष्कर्ष मांडले आहेत.

१) राज्याची उत्पत्ती कुटुंब संस्था खेडी व अनेक खेडी एकत्र येऊन राज्य निर्माण झाले.
२) राज्य रचना शरीर शास्त्राप्रमाणे तो सांगतो.
३) राज्याने लवकरात लवकर न्यायहीन करावे.
४) राज्यव्यवस्थांची वस्तुनिष्ठ मांडणी केली आहे.
५) बहुसंख्याकांना विचारात घेऊन निर्णय घ्यावेत.
६) सर्वसामान्यांचा गरजा पूर्ण होतील एवढा राज्याचा आकार असावा.
७) परकीय राज्य जिंकणे हा राज्याचा उद्देश असू नये.
८) कष्ट करणाऱ्या लोकांना नागरिकत्व देऊ नये.

वरीलप्रमाणे संशोधकांनी निष्कर्ष मांडले आहेत.

**संदर्भग्रंथ :-**

1) पाटील संतोष, राजकीय विचारप्रणाली, शुभम प्रकाशन, लातूर 2005
2) डोळे ना. य., प्रमुख पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद 1999
3) प्रदीप आढे, पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद 2016
4) स. मा. गर्गे, राज्यशास्त्र विकास प्लेटो, ऑरीस्टॉटल, गांधी रॉय राजकीय विचार, के सागर पब्लिकेशन पुणे